# लघुवाद न्यायालय, मुंबई

## भरती प्रक्रिया – २०२५

# सविस्तर जाहिरात

**लघुवाद न्यायालय, मुंबई ह्या आस्थापनेवारील खालील सारणीत नमूद पदांची निवड यादी आणि प्रतिक्षा यादी तयार करण्यासाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. जे उमेदवार दिनांक ११/०९/२०२५ रोजी त्या त्या पदासाठी पात्रतेचे निकष पूर्ण करतात, त्यांनी यापुढे दिलेल्या विहीत नमुन्यात प्रत्यक्ष अर्ज मागविण्यात येत आहेत.**

| अक्र. | पदनाम | पदसंख्या | |
|---|---|---|---|
| | | निवड यादी | प्रतिक्षा यादी |
| १. | ग्रंथपाल (Librarian) | ०१ | ०२ |
| २. | पहारेकरी (Watchman) | ०२ | ०४ |
| ३. | माळी (Gardener) | ०१ | ०२ |

| पदनाम – ग्रंथपाल (Librarian) | |
|---|---|
| १. | **पात्रतेचे निकष**:<br>**अ)** कमीत कमी एस. एस. सी. (S.S.C.) बोर्ड परीक्षा उत्तीर्ण असावा. परंतु, कोणत्याही मान्यताप्रापत विद्यापीठाच्या कोणत्याही शाखेच्या पदवीधारकास आणि कायद्याच्या पदवीधारकास प्राधान्य दिले जाईल.<br>**ब)** कमीत कमी ग्रंथालयीन विज्ञान पदविका (Diploma in Librarian Science) धारक असावा. **ग्रंथालयीन विज्ञान पदवीधारकास प्राधान्य दिले जाईल.**<br>**क)** संगणकाचे ज्ञान असल्याबाबतचे खालील संस्थांकडील प्रमाणपत्रधारक असावा.<br>i) डी.ओ.ई. ए.सी.सी. / एन.आय.ई.एल.आय.टी. (D.O.E.A.C.C./N.I.E.L.I.T.)<br>ii) विद्यापीठ<br>iii) सी–डॅक (C–DAC)<br>iv) एम.एस.–सी.आय.टी. (MS–CIT)<br>v) व्यावसायिक शिक्षणक्रम – राज्य सरकार |

| | |
|---|---|
| | vi) व्यावसायिक शिक्षणक्रम – केंद्र सरकार<br>vii) आय.टी.आय. – राज्य सरकार<br>viii) आय.टी.आय. – केंद्र सरकार<br>ix) तांत्रिक मंडळ |
| २. | **वेतनश्रेणी:**<br>सातव्या वेतन आयोगानुसार वेतर स्तर (एस–७) या वेतन संरचनेत वेतन ` **२१७००–६९१००/–** व नियमानुसार इतर देय भत्ते. |
| ३. | **कामाचे स्वरुप:**<br>**अ)** ग्रंथालयासाठी पुस्तके व प्रकाशने खरेदी करण्याचा प्रस्ताव सादर करणे.<br>**ब)** ग्रंथालयामधील पुस्तके बाईंडिंग करण्यासाठी दरपत्रके मागविणे.<br>**क)** न्यायाधीशांनी मागणी केलेल्या पुस्तकांचा पुरवठा करणे.<br>**ड)** न्यायिक अधिकाऱ्यांच्या निवासस्थानी असलेल्या ग्रंथालयासाठी पुस्तकांचा पुरवठा करणे.<br>**इ)** न्यायिक अधिकाऱ्यांच्या दालनामधील पुस्तकांची दर सहा महिन्यांनी तपासणी करणे आणि त्यानुसार कार्यालयाकडे अहवाल सादर करणे.<br>**ई)** ग्रंथालयामध्ये असलेल्या नोंदवह्या सुस्थितीत व अद्ययावत ठेवणे.<br>**उ)** मे महिन्यामधील उन्हाळी सुटीमध्ये ग्रंथालयामधील पुस्तकांचा वार्षिक आढावा घेणे.<br>**ऊ)** ग्रंथालयामधील जुन्या व खराब पुस्तकांची विल्हेवाट लावण्यासाठी प्रस्ताव सादर करणे.<br>**फ)** वरील अ ते ऊ मध्ये नमूद केलेल्या कामाव्यतिरिक्त मा. मुख्य न्यायाधीश तसेच इतर न्यायिक अधिकारी व आस्थापना आधिकारी यांच्या निर्देशानूसार आवश्यक ती सर्व कामे करणे. |
| ४. | **परीक्षेचे स्वरुप:**<br>'ग्रंथपाल' पदाकरिता ज्या उमेदवारांची नांवे लघुसूचीत (Shortlisted) करण्यात येतील, अशा पात्र उमेदवारांची **'ग्रंथालय विज्ञान, संगणक (मुलभूत) व इंग्रजी व्याकरण** विषयांवर आधारित ५० गुणांची वस्तूनिष्ठ (Objective) स्वरुपाची परिक्षा घेण्यात येईल. वस्तुनिष्ठ (Objective) परीक्षेमध्ये यशस्वी झालेल्या उमेदवारांपैकी सल्लागार समिती यांचे कडून निश्चित केले जाणारे 'कट–ऑफ' गुण मिळविणाऱ्या उमेदवारांना १०० गुणांच्या लेखी परीक्षेसाठी (subjective Test) साठी बोलविले जाईल व त्यामधून यशस्वी झालेल्या उमेदवारांपैकी, वस्तूनिष्ठ परिक्षेमध्ये जास्तीत जास्त गुणांचे आधारे नमूद पदांच्या संख्येच्या तीन पट (१:३) हे प्रमाण राखण्यासाठी लघुसूचित केलेल्या उमेदवारांपैकी शेवटच्या उमेदवाराइतके गुण मिळवणारे एकापेक्षा अधिक उमेदवार असतील तर, अशा सर्व उमेदवारांना २० गुणांच्या मुलाखातीकरिता बोलाविले जाईल. उमेदवारांची निवड ही लेखी परीक्षा (subjective Test) व मुलाखतीमधील प्राप्त झालेल्या एकूण गुणांच्या गुणवत्तेनुसार व मा. उच्च न्यायालयाच्या मंजूरीस अधिन राहून करण्यात येईल. |

| पदनाम – पहारेकरी (Watchman) | |
|---|---|
| १. | पात्रतेचे निकष:<br>**अ)** कमीत कमी इयत्ता ७ वी (मराठी भाषेसह) उत्तीर्ण असावा.<br>**ब)** सुदृढ शरिरयष्टी आणि पदाच्या कामाचे स्वरुप विचारात घेवून सर्वार्थाने सक्षम असणे आवश्यक. |
| २. | **वेतनश्रेणी:**<br>सातव्या वेतन आयोगानुसार वेतर स्तर (एस–१) या वेतर संरचनेत वेतन ` **१५०००– ४७६००/–** व नियमानुसार इतर देय भत्ते. |
| ३. | **कामाचे स्वरुप :**<br>**अ)** न्यायालयीन इमारतीच्या आवारात तीनही पाळ्यांमध्ये आलटून पालटून सुरक्षा/पहारा देणे.<br>**ब)** कार्यालयीन वेळेच्या नंतर न्यायालयीन कक्ष व विभाग बंद असल्याबाबतची तपासणी करणे.<br>**क)** कार्यालयीन वेळेच्या व्यतिरिक्त न्यायालय परिसरात प्रवेश करणाऱ्या व्यक्तीची नोंदवहीत नोंद घेणे.<br>**ड)** रात्रीच्या वेळेत न्यायालयीन संपूर्ण परिसराची देखरेख करणे<br>**इ)** वरील अ, ब व क मध्ये नमूद केलेल्या कामाव्यतिरिक्त मा. मुख्य न्यायाधीश तसेच इतर न्यायिक अधिकारी व आस्थापना आधिकारी यांच्या निर्देशानूसार आवश्यक ती सर्व कामे करणे. |
| ४. | **परीक्षेचे स्वरुप:**<br>'पहारेकरी' पदाकरिता ज्या उमेदवारांची नांवे लघुसूचीत (Shortlisted) करण्यात येतील, अशा उमेदवारांची इतिहास, भूगोल, सामान्य ज्ञान, मराठी भाषेचे ज्ञान व चालू घडामोडी या विषयांवर आधारित २० गुणांची वस्तूनिष्ठ (Objective) स्वरुपाची परिक्षा घेण्यात येईल व त्यांना सल्लागार समिती यांचे कडून निश्चित केले जाणारे 'कट–ऑफ' गुण मिळविणे आवश्यक राहील. अशा सर्व उमेदवारांना वस्तूनिष्ठ परिक्षेमध्ये जास्तीत जास्त गुणांचे आधारे नमूद पदांच्या संख्येच्या तीन पट (१:३) हे प्रमाण राखण्यासाठी लघुसूचित केलेल्या उमेदवारांपैकी शेवटच्या उमेदवाराइतके गुण मिळवणारे एकापेक्षा अधिक उमेदवार असतील तर, अशा सर्व उमेदवारांना २० गुणांच्या मुलाखातीकरिता बोलाविले जाईल. |

| पदनाम – माळी (Gardener) | |
|---|---|
| १. | **पात्रतेचे निकष:**<br>**अ)** उमेदवार शारीरिदृष्ट्या सक्षम, सुदृढ आणि निव्यसनी असावा.<br>**ब)** उमेदवार कमीत कमी चौथी इयत्ता उत्तीर्ण असावा.<br>**क)** उमेदवारास किमान ३ वर्षांचा बगीचे, हिरवळ, वनस्पती आणि झाडे इत्यादी सुस्थितीमध्ये ठेवण्याचा अनुभव असावा.<br>**ड)** उमेदवारास मराठी भाषा लिहिता वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.<br>**इ)** शासनमान्य माळी प्रशिक्षण अभ्यासक्रम पूर्ण करून प्रमाणपत्र धारक उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. |
| २. | **वेतनश्रेणी:**<br>सातव्या वेतन आयोगानुसार वेतर स्तर (एस–१) या वेतन संरचनेत वेतन **१५००० – ४७६००/–** व नियमानुसार इतर देय भत्ते. |
| ३. | **कामाचे स्वरुप:**<br>**अ)** बागेची योग्यप्रकारे देखरेख करणे<br>**ब)** बागेतील झाडांची आवश्यकतेनुसार वेळोवेळी छाटणी करणे.<br>**क)** बागेतील झाडावर वेळोवेळी किटकनाशकांची फवारणी करणे.<br>**ड)** बागेसाठी लागणाऱ्या अवजारांची कार्यालयाकडे मागणी करणे व पुरविल्यावर सांभाळणे.<br>**इ)** बागेत प्रत्येक वर्षी नवीन रोपांची लागवड करणे.<br>**ई) वरील सर्व कामाव्यतिरिक्त कार्यालयाने वेळोवेळी नेमून दिलेली कामे करणे.** |
| ४. | **परिक्षेचे स्वरुप:**<br>'माळी' पदाकरिता ज्या उमेदवारांची नावे लघुसूचित करण्यात येतील, अशा उमेदवारांना उद्यान/ बगिचा देखभाली संदर्भात २० गुणांची प्रात्यक्षिक परीक्षेकरिता बोलावण्यात येईल तसेच शारिरिक क्षमता चाचणी १० गुणांची असेल व त्यांना सेवा भरती समिती यांचे कडून निश्चित केले जाणारे 'कट–ऑफ' गुण मिळवणे आवश्यक राहील. अशा सर्व उमेदवारांना प्रात्यक्षिक परीक्षमध्ये मिळालेल्या जास्तीत जास्त गुणांचे आधारे नमूद पदांच्या संख्येच्या तीन पट (१:३) हे प्रमाण राखण्यासाठी लघुसूचीत केलेल्या उमेदवारांपैकी शेवटच्या उमेदवाराइतके गुण मिळवणारे एकापेक्षा अधिक उमेदवार असतील तर अशा सर्व उमेदवारांना १० गुणांच्या मुलाखातीकरिता बोलाविले जाईल. |

## सर्व पदांकरता वयोमर्यादा व अटी

| | |
|---|---|
| (अ) | उमेदवार, सर्वसाधारण प्रवर्गाकरिता १८ वर्षापेक्षा कमी वयाचा आणि ३८ वर्षापेक्षा जास्त वयाचा नसावा आणि अनूसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग किंवा महाराष्ट्र शासनाद्वारे २८.०३.२०१८ रोजी त्यावेळेपुरत्या विनिर्दिष्ट केलेल्या विशेष मागासप्रवर्गाकरिता ४३ वर्षापेखा जास्त वयाचा नसावा. |
| (ब) | शासन निर्णय क्र. एस.आर.व्ही.–१०७७/३५७६/१४३३/१६–अ, दिनांक २३/०५/१९७८ नुसार शारीरिकदृष्टया अपंग व्यक्ती, जर त्या अन्यथा योग्य व सदर पदाची कर्तव्य पार पाडण्याकरिता सक्षम असतील, तर त्यांच्याबाबतीत सेवा प्रवेशासाठी विहित केलेले उच्च वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिल केलेली आहे. |
| (क) | उमेदवारास नैतिक पतनाच्या गुन्ह्यासाठी दोषी ठरविण्यात आले नसावे किंवा कोणत्याही न्यायालय/महाराष्ट्र लोकसेवा आयोग तथा एम.पी.ए.सी./ केंद्रीय लोकसेवा आयोग तथा यु.पी.एस.सी. किंवा कोणत्याही राज्य सेवा आयोगाने त्यांच्याद्वारे आयोजित केलेल्या परीक्षा निवडीमध्ये उपस्थित राहण्यापासून कायमचे काढून टाकले नसावे किंवा अपात्र ठरविले नसावे. |
| (ड) | उमेदवारास फौजदारी न्यायालयाने दोषी ठरविले नसावे किंवा त्याच्याविरूध्द फौजदारी खटला प्रलंबित नसावा. |
| (इ) | दिनांक २८/०३/२००५ नंतर जन्मास आलेले अपत्य धरुन उमेदवाराच्या हयात मुलांची संख्या एकूण ०२ पेक्षा जास्त नसावी. परंतु, असे की, दिनांक २८/०३/२००५ पासून एका वर्षाच्या कालावधीत एकाच प्रसुतीमध्ये जन्मलेले मूल किंवा एकापेक्षा अधिक मुले अनर्हतेच्या प्रयोजनासाठी विचारात घेण्यात येणार नाही. |

## उमेदवारांकरिता महत्त्वाच्या सूचना

| | |
|---|---|
| १) | पात्र उमेदवाराने जाहिरातीसोबतच्या परिशिष्ट अ मधे दिलेल्या नमुन्यातच अर्ज भरावा. |
| २) | अर्जदाराने **ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचा उल्लेख बंद लिफाफ्यावर ठळक अक्षरात** करुन अर्ज **प्रबंधक, लघुवाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग, धोबी तलाव, मुंबई – ४०० ००२** यांचेकडे पाठवावेत. एका उमेदवारास वेगवेगळ्या पदाकरिता अर्ज करावयाचे असल्यास वेगवेगळे अर्ज सादर करावेत. एकाच अर्जावर तीनही पदे किंवा एकाच लिफाफ्यात तीनही पदे लिहून पाठविल्यास ते रद्द समजले जाईल. |
| ३) | उमेदवाराने आपले अर्ज, घोषणापत्र व नमुने लघुवाद न्यायालय, मुंबई यांच्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन घेवून, केवळ (ए–४) आकाराच्या, चांगल्या दर्जाच्या कागदावर, सुस्पष्ट व सुवाच्च अक्षरात भरुन, नोंदणीकृत पोच डाकेने म्हणजेच (RPAD) किंवा शीघ्र डाकसेवेन (Speed |

| | |
|---|---|
| | Post) पोचपावतीसह **प्रबंधक, लघुवाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग, धोबी तलाव, मुंबई – ४०० ००२** या पत्त्यावर (सुट्टीचे दिवस वगळता) दिनांक २५.०९.२०२५ रोजी सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी पोहचतील अशा बेताने पाठवावे. |
| ४) | ऐन वेळेची घाई गर्दी टाळण्यासाठी उमेदवारांना सूचीत करण्यात येते की, त्यांनी त्यांचे अर्ज पूरेसा कालावधी शिल्लक असतानांच सादर करावेत. |
| ५) | कोणत्याही परिस्थितीत हस्तप्रेक्षणाद्वारे (by hand/e-mail/whatsapp) द्वारे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. |
| ६) | अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम तारखेनंतर प्राप्त अर्जांचा, सूचना क्र. ३ व्यतिरिक्त आलेल्या अर्जांचा, डाकेने विलंब झालेल्या अर्जांचा, बंद पाकीटावर पदाचे नांव नमूद नसलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. |
| ७) | अधिसुचित करण्यात आलेल्या पदांची संख्या ढोबळमताने परिगणित केलेली असून त्यात आवश्यकतेनुसार बदल होवू शकतो. अधिसुचित केलेल्या संख्येइतक्या उमेदवारांची निवड उपलब्धता, प्रशासनाची, आस्थापनेची आवश्यकता विचारात घेवून, परिस्थितीनुसार समर्थनीय कारण विचारात घेवून अधिसूचित संख्येपेक्षा कमी/जास्त उमेदवारांची निवड, समिती करू शकते. |
| ८) | **अर्ज करणाऱ्या उमेदवारांना सुस्पष्ट जाणीव करून देण्यात येत आहे की, त्यांनी उमेदवारी अर्ज सादर केला म्हणून त्यांना चाचणी/मुलाखातीस बोलविण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही.** निवड समिती, प्रशासकीय व आस्थापनीय निकड विचारात घेवून, उमेदवारांची उच्च शैक्षणिक अर्हता आणि शैक्षणिक श्रेष्ठत्व यावर आधारीत प्राप्त झालेले अर्ज लघुसूचीत करू शकेल व लघुसूचित होण्यात यशस्वी झालेल्या उमेदवारांचाच पूढील टप्प्यांसाठी विचार केला जाईल. उमेदवारांची शैक्षणिक अर्हता संबंधाने निवड समिती ठरवील ते निकष लागू करुन, त्यांची लघुसूची तयार करण्याचा अधिकार निवड समितीस आहे. ही लघूसूची लघुवाद न्यायालय, मुंबई यांचे संकेतस्थळ तसेच सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल. |
| ९) | लघुसूचित नावाची नोंद असलेल्या उमेदवाराने प्रवेशपत्र लघुवाद न्यायालय, मुंबई येथून प्राप्त करावयाचे आहे. त्याकरिता स्वतःचे दोन नुकतेचे काढलेले/अर्जावर चिटकवलेले पारापत्र म्हणजेच पासपोर्ट आकाराचे छायाचित्र अर्जासोबत जोडावयाचे आहेत. उमेदवारांनी आपले अर्जावर निर्दिष्ट जागी त्याचे/तिचे पासपोर्ट आकाराचे नवीनतम छायाचित्र चिकटवावे आणि त्यावर आपली स्वाक्षरी करावी. स्वाक्षरीची सुरुवात छायाचित्रावर करुन तिचा काही भाग छायाचित्राबाहेर येईल अशा रितीने स्वाक्षरी करावी. |
| १०) | प्रवेशपत्र प्राप्त करतांना उमेदवाराने आपली ओळख पटविणारा कोणताही एक दस्त, जसे की, आधार |

| | |
|---|---|
| | कार्ड, पारपत्र, वाहन चालविण्याचा परवाना, मतदान ओळखपत्र, पॅन कार्ड, शैक्षणिक संस्थेने प्रदान केलेले ओळखपत्र सादर करावे. |
| ११) | **उमेदवाराने अर्जासोबत कोणतीही मुळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे अथवा साक्षांकित प्रती जोडू नयेत. उमेदवारांना मुळ कागदपत्रे सादर करण्याबाबत योग्य वेळी सूचना दिली जाईल.** |
| १२) | **या कार्यालयाने भरती प्रक्रियेकरिता कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारलेले नसून ती पूर्णपणे निशुल्क आहे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. तसेच अर्जासोबत कोणत्याही प्रकारचे शुल्क जसे की, दर्शनी धनाकर्षं (Demand Draft), प्रदानादेश (Pay Order) धनादेश (Cheque) इ. जोडू नये.** |
| १३) | उमेदवारांनी आपले अर्जासोबत स्वतःच्या नावासह संपूर्ण पत्ता असलेला लिफाफा ५ रुपयाचे डाक टिकीट लावून पाठवावा. |
| १४) | चाचणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांची नावे लघुवाद न्यायालय, मुंबई यांच्या संकेतस्थळावर तसेच लघुवाद न्यायालय, मुंबई यांचे सुचना फलकावर अधिसूचित करण्यात येईल. तसेच उमेदवारांनी वेळोवेळी संकेतस्थळास भेट देणे त्यांचे हिताचे राहील. |
| १५) | त्या त्या चाचणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांनी पुढील प्रक्रियेकरिता त्यांना मिळालेले प्रवेशपत्र दिलेल्या तारखांना सोबत आणावे. |
| १६) | जे उमेदवार यापूर्वीच शासकीय सेवेत आहेत, त्यांनी त्यांचे विभाग/कार्यालय प्रमुखाची लेखी परवानगी घेवूनच अर्ज सादर करावा. असे परवानगीपत्र मुलाखातीच्या वेळी सादर करावे. तसेच उमेदवारांनी आपले अर्ज आपआपल्या विभाग/कार्यालय प्रमुखांमार्फत पाठविण्याची आवश्यकता नाही. |
| १७) | अपूर्ण अर्ज किंवा असा अर्ज, जो उमेदवाराने सादर केलेल्या तपशीलामुळे त्यास पदासाठी अपात्र ठरवेल तो अर्ज बाद ठरविला जाईल आणि त्याबाबत कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही. |
| १८) | जे उमेदवार मुलाखातीकरिता पात्र ठरतील व मुलाखातीकरिता बोलविले जाईल, अशा उमेदवारांनी मुलाखातीच्या वेळी खालील प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती आणि त्यांची मूळ कागदपत्रे लघुवाद न्यायालय, मुंबई यांनी नेमून दिलेल्या अधिकाऱ्यांकडे सादर करावीत. |
| अ) | जन्म प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, बोर्ड सर्टिफिकेट, इत्यादी पुरावा. |
| ब) | उमेदवाराने मुळ अर्जामध्ये नमुद केलेल्या, दोन सन्माननीय व्यक्तिंनी दिलेले चारित्र्य दाखले तसेच त्याचे विरुद्ध कुठल्याही न्यायालयात कोणताही फौजदारी खटला चालू किंवा प्रस्तावित नसल्याचे प्रमाणपत्र, कोणताही फौजदारी खटला असल्यास त्याचा तपशील. |
| क) | अर्हतेच्या रकान्यामध्ये नमूद केलेल्या अर्हता/परीक्षा उत्तीर्ण केल्याबाबतचे निकाल / प्रमाणपत्र. |

| | |
|---|---|
| ड) | अन्य अर्हता या रकान्यामध्ये नमूद केल्यानुसार अर्हता/परीक्षा उत्तीर्ण केल्याबाबतची प्रमाणपत्रे. |
| इ) | शासकीय जिल्हा शल्यचिकित्सक/वैद्यकीय अधिक्षक यांनी दिलेला अपंगत्वाचा दाखला (लागू असल्यास). |
| ई) | शासनाच्या सक्षम अधिकाऱ्याने दिलेला जातीचा दाखला (लागू असल्यास). |
| उ) | या जाहीरातीसोबत लघुवाद न्यायालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेले फौजदारी प्रकरण प्रलंबित नसल्याबाबत तसेच लहान कुटंबाबाबतचे प्रतिज्ञापत्र नमूना – ए, मुळ. |
| ऊ) | उमेदवार यापूर्वीच शासकीय सेवेत कार्यरत असेल तर संबंधित विभागाचे ना–हरकत प्रमाणपत्र. |
| ओ) | विवाहित महिलांनी त्यांचे नांवात बदल झाल्याबाबतचे शासकीय राजपत्र (Gazette) |
| १९) | **प्राप्त झालेल्या अर्जांची लघुसूची/चाचणी/मौखिक चाचणी इ. बार्बीसाठी कमाल गुण आणि पुढील टप्प्यासाठी यशस्वी होण्याकरिता ठरविण्यात आलेले निम्नतम पात्रता गुण (Benchmark) ठरविण्याचा अधिकार निवड समितीस असून त्याबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.** |
| २०) | जेथे निवड करण्यासाठी निम्नतम पात्रता गुण निश्चित करण्यात आले नसतील, तेथे असे निम्नतम पात्रता गुण ३५ टक्के असावेत आणि अनुसूचित जाती/जमातीच्या उमेदवारांसाठी हे गुण ३० टक्के राहतील. सदर प्रक्रिया बंधनकारक नसल्यामुळे धोरणात्मक असेल याची नोंद घ्यावी. |
| २१) | उमेदवारांना चाचणी/मुलाखातीस बोलविले गेले तर त्यांनी निश्चित केलेल्या तारखांना आणि ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. त्यांना खर्चाचा परतावा दिला जाणार नाही. |
| २२) | उमेदवाराने निवड प्रक्रियेच्या संदर्भात स्वतः किंवा कोणामार्फत निवड समितीच्या सदस्यांना अथवा न्यायिक अधिकाऱ्यांना किंवा प्रशासकीय अधिकाऱ्यांना किंवा न्यायालयीन कर्मचाऱ्यांना भेटण्याचा किंवा त्यांचेवर दबाव आणण्याचा किंवा वशिला लावण्याचा प्रयत्न केल्यास त्यास अपात्र ठरविण्यात येईल आणि या बाबतीत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील. |
| २३) | उमेदवारांची निवड ही काटेकोरपणे परीक्षांचे स्वरुप या रकान्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे मिळालेल्या गुणांच्या आधारे तयार करण्यात येणाऱ्या गुणवत्ता क्रमानुसार करण्यात येईल. |
| २४) | निवड सुची/प्रतिक्षा सुची ही माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या मान्यतेच्या अधीन राहून तसेच माननीय मुंबई उच्च न्यायालय विहीत करेल, अशा कालावधीसाठी वैध राहील. |
| २५) | निवड सुची/प्रतिक्षा सुची ही माननीय मुंबई उच्च न्यायालय आणि महाराष्ट्र शासनाद्वारे वेळोवेळी तयार करण्यात आलेल्या नियमांप्रमाणे असेल. |
| २६) | उमेदवारांना शासनाच्या प्रचलित नियमांनुसार अंशदान निवृत्तीवेतन योजना व शासकीय नोकरीच्या प्रयोजनार्थ गठीत सर्व अटी व शर्ती लागू राहतील. |

| | |
|---|---|
| २७) | उमेदवारांची निवड त्यांच्याबाबत संबंधित पोलीस अधिक्षक/पोलीस आयुक्त कार्यालयाकडून प्राप्त करवून घेतल्या जाणाऱ्या चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्रास अधिन राहून असेल. |
| २८) | चुका टाळण्यासाठी, अर्ज पाठविण्यापुर्वी उमेदवारांनी संकेतस्थळावर दर्शविण्यात आलेलया सूचना लक्षपूर्वक वाचाव्यात. |
| २९) | प्रत्येक उमेदवाराचा एका पदासाठी एकच अर्ज असेल, जर एकाच उमेदवाराने एकाच पदासाठी अनेक अर्ज भरले तर, फक्त पहिला अर्ज विचारात घेतला जाईल. जर आवश्यक अर्हतेप्रमाणे उमेदवार इतर पदासाठी पात्र नसेल, तर त्या पदाचा पर्याय त्याच्यासाठी उपलब्ध नसेल. |
| ३०) | उमेदवारांनी याची नोंद घ्यावी की, उमेदवारांनी दिलेली माहिती खरी आहे, असे समजून त्यांची पात्रता निर्धारित करण्यात येईल. जर एखाद्या उमेदवाराने दिलेली माहिती ही खोटी, सदोष अथवा चुकीची आहे, असे कालांतराने आढळून आल्यास, अशा उमेदवारास केवळ अपात्र ठरविण्यात येईल असे नव्हे, तर त्यावर खटलासुध्दा भरण्यात येईल. अशा उमेदवारास कोणत्याही परिक्षेस बसण्यास मनाई करण्यात येईल. त्यास लघुवाद न्यायालस, मुंबई यांच्या आस्थापेनवर कोणत्याही पदासाठी अर्ज करण्यास मनाई करण्यात येईल. |
| ३१) | निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी अर्जदाराने अर्जात दिलेली माहिती खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल अथवा त्यानंतर नियुक्ती झाल्यास त्याला/तिला पदावरून काढुन टाकण्यात येईल. |
| ३२) | मा. उच्च न्यायालयाच्या मान्यतेनंतरच निवड/प्रतिक्षा सूची, लघुवाद न्यायालय, मुंबई यांच्या सूचना फलकावर आणि उपरोल्लेखित अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल. |
| ३३) | सेवाप्रवेश प्रक्रियेच्या वेळापत्रकात या कार्यालयाचे नियंत्रण नसलेल्या कोणत्याही अकल्पित घटनांच्या घडण्यासापेक्ष बदल होवू शकतो. असा बदल वेळोवेळी कार्यालयाच्या सुचनाफलकावर व अधिकृत संकेतस्थळावर अधिसूचित करण्यात येईल. |
| ३४) | लघुसूची, चाळणी परीक्षा, स्वच्छता व क्रियाशिलता चाचणी, वस्तुनिष्ठ परीक्षा, लेखी परीक्षा, मुलाखत याबाबतीत कोणत्याही उमेदवारास वैयक्तिकरित्या कळविले जाणार नाही. |
| ३५) | अंतिम निवड/प्रतिक्षा यादीतील उमेदवार, त्याच्या/तिच्या नियुक्ती आदेशानुसार विहित कालावधीत कर्तव्यावर रुजू न झाल्यास, त्याचे/तिचे नांव निवड/प्रतिक्षा यादीमधून वगळण्यात येईल. |
| ३६) | कोणत्याही वैध कारणामुळे भरती प्रक्रिया रद्द झाल्यास याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे, याबाबत सर्व अधिकार निवड समिती, लघुवाद न्यायालय, मुंबई यांनी स्वतःकडे राखुन ठेवले आहेत. याबाबत |

| | |
|---|---|
| | कोणालाही कोणात्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही. |
| ३७) | कार्यालयाच्या नियंत्रणाबाहेरील कोणत्याही अनपेक्षीत घटनेमुळे भरती प्रक्रियेचे वेळापत्रक बदलू शकते असा बदल वेळोवेळी लघुवाद न्यायालय, मुंबई न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर https://sccmumbai.dcourts.gov.in/notice-category/recruitments/ प्रसिध्द केला जाईल. याबाबत कोणत्याही उमेदवाराला दूरध्वनीद्वारे वा प्रत्यक्ष संपर्क करुन अवगत केले जाणार नाही. |
| ३८) | उमेदवाराला कोणत्याही बदलाबाबतीची सुचना उशिरा मिळाल्यामुळे नियोजित तारखेस व वेळेस उमेदवार प्रात्यक्षिक परीक्षा, शारीरिक चाचणी व तोंडी मुलाखतीसाठी अनुपस्थित राहिल्यास, लघुवाद न्यायालय निवड समितीकडुन या बाबत कोणतीही तक्रार/दावा विचारात घेतला जाणार नाही किंवा ऐकला जाणार नाही. |
| ३९) | निवड यादीतील उमेदवारांची नियुक्ती सुरूवातीला अस्थायी स्वरूपाची असेल. स्थायीबाबतचे प्रमाणपत्र जारी होईपर्यंत नियुक्तीच्या सेवा कोणत्याही वेळी, कोणतीही पूर्वसूचना तथा नोटीस न देता किंवा कोणतेही कारण न देता समाप्त केल्या जातील. |
| ४०) | या निवड प्रक्रियेत निवड समितीने घेतलेला निर्णय हा अंतिम असेल. |

आदेशान्वये,
सही/-
प्रबंधक, लघुवाद न्यायालय, मुंबई

दिनांक : ०९/०९/२०२५

**<u>परिशिष्ट 'अ'</u>**

# लघुवाद न्यायालय, मुंबई,

## भरती प्रक्रिया उमेदवारी अर्ज

(दिलेल्या योग्य त्या रकान्यात बरोबरची म्हणजे ✓ ▯▯▯ खुण करावी)

| | | |
|---|---|---|
| **अर्ज केला ते पद**<br>**ग्रंथपाल** ☐<br>**माळी** ☐<br>**पहारेकरी** ☐ | | अर्जदाराचे नुकतेच काढलेले पारपत्र आकाराचे छायाचित्र चिकटवावे<br><br>अर्जदाराची सही |
| १. | अर्जदाराचे नांव (मराठीत) | श्री/श्रीमती/कुमारी ____________________<br>(आडनाव) (नांव) (वडिल/पतीचे नांव) |
| | अर्जदाराचे नांव (इंग्रजीत) | Mr./Mrs/Ms.____________________<br>(Surname) (First Name) (Middle Name) |
| २. | पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता पिनकोड सह | |
| ३. | कायमस्वरुपी पूर्ण पत्ता पिनकोड सह | |
| ४. | राष्ट्रीयत्व | |
| ५. | संपर्क/भ्रमणध्वनी क्र. | |
| ६. | ई–मेल (असल्यास) | |
| ७. | सेवायोजन | |

| | | |
|---|---|---|
| | कार्यालयातील नोंदणी व अनुक्रमांक | |
| ८. | लिंग | पुरुष ☐ स्त्री ☐ अन्य ☐ |
| ९. | दिव्यांग आहात काय? | होय ☐ नाही ☐ |
| १०. | शासकीय सेवेत आहे का? | होय ☐ नाही ☐ |
| ११. | असल्यास सध्याच्या कार्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र जोडले का? | होय ☐ नाही ☐ |
| १२. | प्रकल्पग्रस्त आहे का? | होय ☐ नाही ☐ |
| १३. | धर्म | |
| १४. | प्रजात | |
| १५. | प्रवर्ग | |
| १६. | जातप्रमाणपत्र आहे का? | होय ☐ नाही ☐ |
| १७. | जन्मदिनांक (अंकात) (दिनांक/महिना/वर्ष) | |
| १८. | जन्मदिनांक (अक्षरी) (दिनांक/महिना/वर्ष) | |
| १९. | जाहीरातीतील नमूद दिनांक / /२०२५ रोजीचे वय | .........वर्षे ............महिने |
| २०. | वैवाहिक स्थिती | वैवाहिक ☐ अविवाहित ☐ |
| २१. | हयात मुलांची संख्या | |
| २२. | २८/०३/२००५ नंतर जन्मलेल्या मुलांची संख्या व जन्मतारखा | |
| २३. | महाराष्ट्राचे अधिवास | होय ☐ नाही ☐ |

| | | |
|---|---|---|
| | प्रमाणपत्र आहे का? | |
| २४. | मराठी लिहीता वाचता बोलता येते का? | होय ☐ नाही ☐ |
| २५. | अवगत अन्य भाषा | |
| २६. | यापूर्वी कोणतीही फौजदारी कारवाई झाली का? | होय ☐ नाही ☐ |
| | असल्यास तपशील | |
| २७. | कोणतीही फौजदारी कारवाई प्रलंबित आहे का? | होय ☐ नाही ☐ |
| | असल्यास तपशील | |
| २८. | यापूर्वीच्या कारवाईत न्यायालयाने दोषी ठरविले होते का? | होय ☐ नाही ☐ |
| | असल्यास तपशील | |
| २९. | यापूर्वी शिस्तभंगाची कारवाई झाली का? | |
| | असल्यास तपशील | |
| ३०. | कोणत्याही न्यायालय/ महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC)/केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) किंवा कोणत्याही राज्य सेवा आयोगाने त्यांच्याद्वारे आयोजित केलेल्या परीक्षा निवडीमध्ये उपस्थित राहण्यापासून कायमस्वरूपी काढुन | होय ☐ नाही ☐ |

| | | |
|---|---|---|
| | टाकले आहे का? | |
| | असल्यास तपशील | |
| ३१. | नातेवाईक न्यायसंस्थेत कार्यरत आहे का? | होय ☐ नाही ☐ |
| | असल्यास तपशील | |
| ३२. | **उमेदवारास ओळखत असलेल्या जबाबदार व्यक्तिंची नावे, संपर्क व पत्ता** | |
| | **व्यक्ती क्र. १** | नाव |
| | | पूर्ण पत्ता |
| | | संपर्क क्रमांक |
| | **व्यक्ती क्र. २** | नाव |
| | | पूर्ण पत्ता |
| | | संपर्क क्रमांक |

**शैक्षणिक पात्रतेचा तपशील (पदाच्या पात्रतेनुसार चढत्या क्रमाने नमूद करावा)**

| अर्हता | मंडळ/विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | प्राप्त गुण | कमाल गुण | प्राप्त गुणांची टक्केवारी | श्रेणी | किती प्रयत्नात उत्तीर्ण झाले |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

**अन्य अर्हतेचा तपशील जसे की संगणक परिचालन/लघुलेखन/टंकलेखन (खालील रकान्यात क्रमवार नमूद करावा)**

| | |
|---|---|
| टंकलेखन | |
| संगणक परिचालन/संगणक ज्ञान | |
| लघुलेखन | |

**अर्ज केलेल्या पदासाठीच्या पूर्व अनुभवाचा तपशील (असल्यास)**

| अ.क्र. | अनुभव(संबंधित काम केलेल्या ठिकाणाचे / कार्यालयाचे नाव, दुरध्वनी क्रमांकासह) | कालावधी | | एकुण (वर्ष–महिने–दिवस) |
|---|---|---|---|---|
| | | दिनांकापासून | दिनांकापर्यंत | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| एकुण | | | | |

## प्रतिज्ञालेख

मी ______________________ राहणार ______________ याद्वारे प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो/करते की, प्रस्तुत अर्जात नमुद सर्व माहिती माझे ज्ञान, माहिती व समजूतीप्रमाणे खरी व बरोबर आहे. वर नमूद माहिती अथवा माहितीची कोणताही भाग चुकीचा/खोटा असल्याचे आढळून आल्यास मी प्रस्तुत भरती प्रक्रियेसाठी आपोआप अपात्र ठरेल आणि तसेच जर माझी निवड/नियुक्ति झाल्यास, कोणत्याही पूर्वसुचनेशिवाय मला सेवेतून काढून टाकण्यात येईल हे मला मान्य आहे आणि त्यानुसार होणाऱ्या सर्व परिणामांस तसेच संभाव्य फौजदारी कारवाईस मी जबाबदार असेल याची मला जाणीव आहे.

दिनांक:

स्थळ/ठिकाण:

(अर्जदाराने पूर्ण नांव स्वहस्ते लिहून सही करावी)

# नमुना 'अ'

# घोषणापत्र

1. मी ............................. या पदासाठी माझा अर्ज सादर केला आहे.

2. आज रोजी मला .................... (संख्या)इतकी मुले आहेत व त्यापैकी २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ..................... इतकी आहे. त्यांच्या जन्मतारखा/तपशील पुढीलप्रमाणे आहे.

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

3. जाहिरातीच्या तारखेस माझे हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असल्यास दिनांक २८ मार्च, २००५ नंतर जन्मास आलेल्या मुलांमुळे मी या पदासाठी अपात्र ठरेल याची मला जाणीव आहे.

4. मी असेही घोषित करतो/करते की, माझेविरूध्द यापूर्वी कोणत्याही फौजदारी खटला झालेला नाही आणि/अथवा सध्या प्रलंबित नाही. तसेच मला कोणत्याही फौजदारी गुन्ह्यात न्यायालयाने दोषी ठरविलेले नाही.

5. मी असेही घोषित करतो/करते की, माझेविरूध्द कोणतीही शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रलंबित नाही अथवा पूर्वी झालेली नाही.

6. मी असेही घोषित करतो/करते की, उमेदवारी अर्ज सादर केला म्हणून मला चाचणी/मुलाखतीस बोलविणे जाण्याचा कोणताही अधिकर प्राप्त होत नाही याची मला जाणीव आहे.

7. मी या भरती प्रक्रियेसाठी दिलेली सर्व माहिती माझ्या ज्ञान, माहिती व समजुतीप्रमाणे खरी व बरोबर आहे.

दिनांक:

स्थळ:

(अर्जदाराने पूर्ण नांव स्वहस्ते लिहून सही करावी)

# <u>नमुना 'ब'</u>

# चारित्र्य/वर्तणूक प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री./श्रीमती/कुमारी ............................................................ हे/हया ................................. तालुका.................. जिल्हा ........................ येथील रहिवाशी असून, मी त्यांना मागील ........... वर्षांपासून ओळखतो/ओळखते. त्यांची वर्तणूक व चारित्र्य चांगले आहे. ते/त्या माझे/माझ्या नातेवाईक नाहीत.

करिता सदरील चारित्र्य/वर्तणूक प्रमाणपत्र देण्यात येत आहे/ दिले आहे.

दिनांक:
स्थळ:

(प्रमाणपत्र देणाऱ्याने पूर्ण नांव स्वहस्ते लिहून सही करावी)

| **प्रमाणपत्र देणाऱ्याचा तपशील** | |
|---|---|
| **पूर्ण नांव** | |
| **पत्ता**<br>**पिनकोड सह** | |
| **संपर्क क्रमांक** | |
| **असल्यास पदनाम** | |